निशाणी २५

फौजदारी प्रक्रिया संहितेमधील प्रकरण एकविस अन्वये संक्षिप्त परिक्षा केलेला
**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २९६/२०२३** चा अभिलेख

**श्रीमती एन.बी. घाटगे, न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवगड**

**निशाणी** २५

| | | |
|---|---|---|
| १) | अपराध घडल्याचा दिनांक | : ०३/११/२०२३ |
| २) | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : २८/११/२०२३ |
| ३) | फिर्यादीचे नाव | : देवगड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ करिता व्यवस्थापक<br>कौस्तुभ चंद्रकांत जामसंडेकर<br>वय- ४८ वर्षे, धंदा- नोकरी<br>रा. मु.पो.जामसंडे, ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग |
| ४) | आरोपीचे नाव, वय व पत्ता | : साई ट्रॅव्हल्स, देवगड करिता<br>विशाल विकास मांजरेकर<br>१] रा. साई ट्रॅव्हल्स, देवगड कार्यालय मांजरेकर नाका, देवगड हायस्कुल समोर, मु.पो. ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग<br>२] श्रीशैल अपार्टमेंट, मु.पो.जामसंडे, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग |

५) ज्या बद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील :

तुम्ही फिर्यादी यांचेकडून घेतलेल्या कर्ज रक्कमेच्या परत फेडीसाठी तुम्ही फिर्यादीला दिलेला स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा देवगड यांचेकडील दिनांक २०/०९/२०२३ रोजीचा धनादेश क्र.३१९९८४ रक्कम रुपये ५,००,०००/- चा धनादेश दिला. सदरचा धनादेश फिर्यादीने त्यांचे खाते असलेल्या सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा देवगड येथे दि. २०/०९/२०२३ रोजी जमा केला असता संबंधित बँकेने वरील नमुद चेक तुमच्या खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे Fund Insufficient न वटविता दिनांक २१/०९/२०२३ रोजी परत केला आणि फिर्यादीने तुम्हास दिनांक १७/१०/२०२३ रोजी धनादेशाची रक्कम मागणीसाठी तुम्हाला

पाठविलेली कायदेशिर नोटीस तुम्हाला दिनांक १८/१०/२०२३ रोजी मिळून देखील तुम्ही १५ दिवसात चेकची रक्कम दिली नाही आणि म्हणून तुम्ही चलनक्षम दस्तऐवज कायद्याचे कलम १३८ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न क्र. १ : तुम्हाला फिर्यादी पक्षाच्या कागदपत्रांच्या नकला मिळाल्यात काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.२ : तुमच्यावर असलेला दोषारोप आता वाचून दाखविला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : नाही, मला गुन्हा कबूल नाही.

दिनांक :११/०७/२०२४

(आरोपीची सही)

समक्ष

(श्रीमती एन.बी. घाटगे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, देवगड

दिनांक :११/०७/२०२४